### सुधागडच्या ग्रामीण भागातील महिलांनी बनविलेल्या

# खाकरे व अन्य उत्पादनांना देशभर मागणी



श्रीमद राजचंद्र आत्मतत्त्व रिसर्च सेंटर परळी-सुधागड येथील श्रमिक महिला गृहउद्योगाच्या महिलांना प्रोत्साहनात्मक विविध पुरस्कार देण्यात आले. (छाया : शरद निकुंभ, पाली)

। पाली ।
दि. २४ (वार्ताहर)

सुधागड तालुक्यात परळी घोटावडे य`थे दहा वर्षापूर्वी श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर प. पू. प्रविण मेहता यांच्या प्रेरण`ने सुरू झाले. स्वत:ची परिपूर्ती आत्मज्ञानाने कशी प्राप्त करून घ`ता येते याचे संशोधन व साध्य असा या आश्रमा मागील हेतु होता. या बरोबरच ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्यासाठी त्यांना काम उपलब्ध करून देण्याच्या कल्पनेतुन श्रमिक नारी संघाची स्थापना करण्यात आली होती. सुरूवातीस दा`न महिलांच्या माध्यमातुन गुजराथी आहारातील खाकरा पदार्थ बनविण्याचे कामास सुरूवात झाली. आज या व्यवसायाचे रूपांतर महिला गृह उद्योगात होत आहे याचा आनंद सर्वांना होत आहे असे प्रतिपादन श्रमिक नारी संघाच्या संचालिका सिमी थापर यांनी केले.

महिला गृह उद्योगाचे उद्घाटन प.पु.पप्पाजी च्या प्रमुख उपस्थितीत उद्योगपती बीपीन बाविसी व निशा बाविसी या च्या हस्ते करण्यात आले. यावळी श्रमिक नारी उद्योग समुहाच्या संचालिका सिमी थापर, मिता हेमाणी, पुनिता अजमेरा, शिल्पा शहा, श्रुती शेठ, प्राणलाल शहा, बीनीन सावला या मान्यवरासह आश्रमाचे अनेक मुमुक्षु यावेळी उपस्थित हा`ते. महिला गृह उद्योगाच्या उत्पादनांचे ब्रॅन्ड नेम चाक्रि असे ठेवण्यात आले आहे. चाक्रि म्हणजे सेवा असा अर्थ होतो. या उद्योगात दिवाळी करीता लागणारे विविध दिवे, सुकामेवा पॅकिंग, चॉकलेट पॅकिंग आणि विविध चवीचे खाकरे असे उत्पादन महिला उद्योगात घेतले जात आहे. आज सुमारे पन्नास महिला या उद्योगात श्रमिक नारी संघाच्या वतीने काम करीत आहे. ग्रामीण भागातील अशिक्षित महिलांना काम शिकवुन त्या ना रोजगाराची संधी आणि आर्थिक विकास घडवुन आणण्यासाठीचा प्रयत्न श्रीमद राजचंद्र आत्मतत्व रिसर्च सेंटर च्या माध्यमातुन केला जात आहे.

गव्हाचे पीठ ते खाकरे निर्मिती पर्यंत अनेक टप्पे या प्रक्रियेत आहे. मशिनरी ते पॅकिंगपर्यंतची कामे हया महिला यशस्वी पण` करत आहेत. आज हया उत्पादनांना देशभर मागणी आहे, म्हणून येत्या काही वर्षात हया उद्योगाचा विकास करण्याच्या दृष्टीने एक हजार महिलांना काम मिळेल व आंतरराष्ट्रीय स्तरावर श्रमिक नारी संघाचे नाव अभिमानाने घेतले जावे असे स्वप्न बाळगुन कामाला लागा, थांबु नका कारण जो थांबला त्याचा विकास खुंटला असे प्रोत्साहन व प्रेरणात्मक आवाहन प.पु.प्रविण मेहता उर्फ पप्पाजी यांनी यावेळी केले. यावेळी महिला कामगारांना विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. आमच्या अशिक्षितपणाला योग्य मार्गदर्शन व प्रेम देऊन या उद्या`गात सन्मानाने काम करण्यासाठी दिलेले सर्व संचालिकांनी योगदान हे खूप मोठे आहे. आम्हांला रोजगार व मुलांना शिक्षण आणि परिवराचे आरोग्य सर्वच काही सोयीसुविधा या छता खाली मिळत असल्याचा आनंद यावेळी या महिलांनी व्यक्त केला. आदिवासी व आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या गटातील विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळावे म्हणुन आश्रमातर्फे बालवाडी पासुन इंग्रजी माध्यमाची शाळा काढण्यात आली. वीस मुलांच्या उपस्थिती पासुन सुरूवात झालेल्या या शाळेत आज चारशे पन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहे.

आश्रमामार्फत फिरता दवाखाना सुरू करण्यात आला होता. याला मिळालेला प्रचंड प्रतिसाद बघता परळी येथे क्लिनिक उघडण्यात आले. यात मुबंईतील नामांकित डॉक्टर कान नाक घसा, त्वचा रोग, श्वसनरोग असे विविध आजारांवरील सेवा देण्याचे काम करीत आहेत. तालुक्यात सर्व सा`यींनी युक्त असे मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र आश्रमातर्फे सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी डॉ. हरेश ग्रोशर यांनी दिली.